# केंद्र अन् राज्याच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या

## शरद शेतकरी संवाद मेळाव्यात पवार यांची टीका

## तालुक्यातील गुंडगिरीविरोधात उठाव करा : आ. रोहित पवार

✔ बार्शी/प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. त्यामुळे लोकसभेप्रमाणेच विधानसभेलाही मतदारांनी परिवर्तन घडवले तरच शेतकऱ्यांचे चित्र बदलेल. त्यामुळे भांडवलशहा धार्जीण्या सरकारला घालवा अशी टीका माजी केंद्रीय कृषिमंत्री, खा. शरद पवार यांनी केली.

बार्शी शहर व तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने आयोजित केलेल्या शरद शेतकरी संवाद मेळाव्यात खा. पवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील पाटील, आमदार रोहित पवार, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले, जिल्हाध्यक्ष बळीराम साठे उपस्थित होते. यावेळी खा. पवार म्हणाले, बार्शीला अनेक वेळा येऊन गेलो आहे. प्रभाताई झाडबुके व शैलजाताई शितोळे यांनी विधिमंडळात चांगले काम केले आहे. आज लोकांच्या प्रश्नांची मांडणी करणारे लोकप्रतिनिधी कमी झाले आहेत. आमच्या मुख्यमंत्रीपदाच्या व कृषिमंत्री पदाच्या काळात शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न केले. फळबाग लागवडीला प्रोत्साहन दिले. त्यामुळे देशातील फळबाग क्षेत्र वाढले. निर्यातीला प्रोत्साहन दिल्यामुळे शेतकऱ्यांचा माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकला गेला. शेतकऱ्यांना विविध सवलती दिल्यामुळे शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी झाला. कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांना ८० हजार कोटींची कर्ज माफी केली. त्यामुळे शेतकरी कर्जमुक्त झाला. यावेळी खासदार पवार यांनी लागेल. विश्वास बारबोलेंसारख्या नवीन नेत्यांनी चांगली सहकाऱ्यांची फळी निर्माण केली असून भविष्यातही त्यांच्या पाठीशी राहणार आहोत, असे सांगितले. यावेळी आमदार रोहित पवार यांनी स्थानिक राजकीय संदर्भ घेत बार्शी तालुक्यात भ्रष्टाचार व दडपशाहीच्या विरोधात उठाव करा असे आवाहन केले. यावेळी प्रास्ताविकामध्ये माजी उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले यांनी बार्शी तालुक्यातील तरुण, उद्योग व्यवसायांसाठी बार्शी सोडून पुणे मुंबईकडे जात आहेत त्यांना चांगले वातावरण उपलब्ध करून देण्याची गरज आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली. खासदार धैर्यशील पाटील यांनी विकास जागेवरच आहे फक्त योजना मोठ्या झाल्या, अशी टीका सरकारवर केली. यावेळी राज्य युवती प्रदेशाध्यक्ष सक्षणा सलगर, जिल्हाध्यक्ष कविता म्हेत्रे, विधानसभा अध्यक्ष भारत देशमुख, शहराध्यक्ष किरण देशमुख, सौंदरेचे सरपंच शिवशंकर ढवण यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी ओबीसी सेलच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र शांताराम जाधवर व तालुका अध्यक्ष निवडीचे पत्र विजय अडसूळ यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी माजी आमदार राहुल मोटे, परिवहन महामंडळाचे माजी अध्यक्ष जीवनराव गोरे, माजी आमदार विनायक पाटील, नारायण पाटील, सुनील गव्हाणे, महिला जिल्हाध्यक्ष सुवर्णा शिवपुरे, जयमाला गायकवाड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता देव यांनी केले. सभेसाठी जिल्हा उपाध्यक्ष इकबाल पटेल, शंकर देवकर, उमेश नेवाळे, आदेश वाणी, जॉन चोप्रा आदींनी परिश्रम घेतले.



बार्शी : शरद शेतकरी संवाद मेळाव्यात मार्गदर्शन करताना शरद पवार.सोबत विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील पाटील, विश्वास बारबोले, कृष्णराज बारबोले, बळीराम साठे आदी.

### सरकारने शेतकऱ्यांच्या सवलती काढून घेतल्या : पवार

गेल्या दहा वर्षात केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या सवलती काढून घेतल्या. कर वाढवले शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली नाही. उत्पादन खर्च वाढला मात्र शेतीमालाचे बाजार मूल्य वाढले नाही त्यामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली. शेतकऱ्यांच्या हिताशी देणे घेणे नसलेले सरकार शेतकऱ्यांनी घालवले पाहिजे आणि विधानसभेला महाविकास आघाडीला राज्यात सत्तेवर आणा, असे आवाहन पवार यांनी केले.

### संधी दिली तर सोने करेन : बारबोले

यावेळी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले म्हणाले, राष्ट्रवादी स्थापन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी बारबोले घराण्याने राष्ट्रवादीत प्रवेश केला. पवार यांच्या नेतृत्वावर निष्ठा ठेवून काम केले आहे. गेली दहा वर्ष ज्यांना सहकार्य केले त्यांनी दडपशाहीचे राजकारण केले. शहरात कोरोना काळात बंद पडलेली वस्त्रोद्योग गिरणी पुन्हा सुरू करण्याची गरज आहे. चेन्नई सुरत महामार्गामुळे बाधित झालेल्या १६ गावातील शेतकऱ्यांना भूसंपादनाचे मावेजा तातडीने देण्याची गरज आहे. राष्ट्रवादीने संधी दिली तर सोने करू.

### सभेत मराठा आरक्षणांसदर्भात घोषणा

शरद पवार यांचे या मेळाव्यात भाषण सुरू झाल्यानंतर काही वेळाने मराठा आरक्षण समर्थक कार्यकर्त्यांनी उठून जोरदार घोषणाबाजी केली. आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करा असा ओरडा करत काळे फडके दाखवून निषेध करण्याचा प्रयत्न केला. मात्र पवार यांनी या आंदोलनकर्त्यांकडे दुर्लक्ष केले. या कार्यकर्त्यांना पोलिसांनी नंतर ताब्यात घेऊन सोडून दिले.

## संक्षिप्त वृत्त


सोलापूर : पेन्शनर संघटनेच्या उपोषणला पाठिंबा देण्यासाठी उपस्थित असलेले फारूख शाब्दी.

### पेन्शनर संघटनेच्या उपोषणाला एमआयएमचा पाठिंबा

✔ **सोलापूर** : जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी पेन्शनर संघटनेच्यावतीने पूनम गेटसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे. याला एमआयएमच्यावतीने शहर- जिल्हाध्यक्ष फारूक शाब्दी यांनी पाठिंबा दिला. पेन्शनर संघटनेची मागणी योग्य आहे. त्याला सर्वांनी पाठिंबा द्यावा. यांच्या मागण्या पाहिल्या असता सोलापूर महापालिकेतूनच यांना न्याय मिळत नाही. न्याय मिळावा म्हणून ९७ वर्षाच्या वृद्धाला उपोषणाला बसावे लागले ही सोलापूर महापालिकेसाठी लाजीरवाणी बाब आहे. या लोकांना ४० वर्ष महापालिकेत काम केले, त्यांना आपल्या हक्कासाठी लढावे लागते हे दुर्दैव आहे. या सगळ्यांना न्याय मिळालाच पाहिजे. यावेळी शाब्दी यांच्यासमवेत एमआयएमचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पेन्शनर संघटनेला पाठिंबा देण्यासाठी माऊली पवारही आले होते.


सोलापूर : ड्रेनेजलाईनच्या कामाची पाहणी करताना किसन जाधव यांच्यासह महापालिकेचे अधिकारी.

### प्रभाग २२मधील ड्रेनेजलाईनचे काम अंतिम टप्प्यात

✔ **सोलापूर** : सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ हे सर्व मूलभूत सुविधांयुक्त व्हावे यासाठी दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेवून काम केले आहे. अमृत १ योजने अंतर्गत दोन कोटी रुपये निधी खर्चित ड्रेनेज लाईन काम अंतिम टप्प्यात आले असून लवकरच हे पूर्ण होणार आहे, असे माजी नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले. सर्वसामान्य नागरिकांची कामे करण्यासाठी राज्यस्तर आणि महापालिका स्तरावरील सर्वाधिक निधी खेचून आणला. प्रभागांमध्ये सर्वत्र सिमेंट काँक्रिटीकरण, दिवाबत्ती, पिण्याचे पाण्याचे पाईपलाईन आधी गरजवंत सुविधा नागरिकांना दिल्यावेही जावध यांनी सांगितले. ड्रेनेज लाईन काम लवकरच हे पूर्ण होणार आहे, असे ते म्हणाले. याच कामाची पाहणी किसन जाधव यांनी केली. यावेळी अक्षय सचिन जाधव, महापालिकेचे अधिकारी कुंभार, इरफान शेख,युवराज जाधव, विशाल गायकवाड, जब्बार शेख, महिबुब शेख, महमद शेख महादेव राठोड, माणिक कांबळे आदी उपस्थित होते.

### क्रिकेट स्पर्धेसाठी १५ पासून खेळाडूंची निवड चाचणी

✔ **सोलापूर** : १४ वर्षाखालील मुलांची क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंची निमंत्रित स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा संघाची निवड चाचणी १५ रोजी होणार आहे. १५ रोजी ग्रामीण खेळाडूसाठी निवड चाचणी आहे. १६ रोजी दुपारी शहरातील खेळाडूंची निवड भंडारी मैदान, विजापूर रोड येथे होणार आहे. निवड चाचणी चेअरमन राजेंद्र गोटे, वैभव इराबत्ती, सत्यजीत जाधव, डॉ .महेश ढेंबरे विक्रांत पवार करणार आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व क्रिकेट खेळणाऱ्या मुलांना यावेळी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आली आहे.


# डाळिंबाच्या नव्या 'सोलापूर अनारदाना' वाणाचे पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण


✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापुरातील राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राने संशोधित केलेल्या डाळिंबाच्या नव्या 'सोलापूर अनारदाना' या वाणाचे रविवारी नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झाले. या कार्यक्रमात भारतीय कृषी संशोधन संस्थेअंतर्गत देशभरात कार्यरत विविध संशोधन संस्थांनी विकसित केलेली विविध फळे आणि पिकांची १०९ वाणे प्रसारीत करण्यात आली.



नवी दिल्ली येथील संशोधन केंद्राच्या पुसा येथील 'आयएआरए'च्या प्रक्षेपणात सकाळी हा कार्यक्रम पार पडला. संपूर्ण देशात डाळिंब प्रक्रियेसाठी शिफारस करण्यात येणारं पहिलेच वाण आहे. सध्याच्या स्थितीत अनारदाना तयार करण्यासाठी डाळिंबाच्या 'नाना' या जंगली जातीचा वापर केला जात होता. संशोधन केंद्राने 'सोलापूर अनारदाना' हे खास प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणारे पहिले डाळिंबाचे वाण संशोधित केले. संशोधन केंद्राचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. दिनेश बाबू यांनी त्यासाठी योगदान दिले.





### 'सोलापूर अनारदाना'ची गुणवैशिष्ट्ये

उच्च-गुणवत्तेच्या अनारदाना (सुके डाळिंबाचे बी) उत्पादनासाठी हे वाण फायदेशीर, मऊ बियांमुळे, गडद लाल दाण्यांमुळे आणि उच्च रसामुळे त्याला विशिष्ठ ओळख, फळे मध्यम ते मोठ्या आकाराची मिळतात, ज्याचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅमपर्यंत राहते, प्रत्येक झाडामध्ये दरवर्षी सरासरी १८ ते २० किलो उत्पादन हमखास होते, या दाण्यांचा स्वाद गोड-आंबट आहे, ज्यामुळे ताजे सेवन, अनारदानामध्ये प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरते.

# कोयत्याने मारहाण करून २ लाख रुपये पळवले

**माढा** : पूर्वीच्या भांडणावरून दुचाकी प्रवास करताना चारचाकी वाहनातून आलेल्या ५ जणांनी कोयत्याने मारहाण करून दोन लाख रुपये पळवले. ही घटना उंदरगाव (ता.माढा) येथील चव्हाणवस्ती जवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात माढाच्या पोलिसांनी संतोष गोरख सावंत (रा. वाकाव) आणि अन्य ५ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

- उंदरगाव येथील घटना
- पाचजणांवर गुन्हा दाखल

शाहू अनंता कोकाटे (वय ४२ ) आणि त्यांचे बंधू धनाजी कोकाटे (दोघे रा.वाकाव ता.माढा) अशी जखमींची नावे आहेत. उंदरगाव येथील चव्हाण यांच्या वस्तीजवळ आले असता चार चाकी वाहनातून आलेल्या त्यांच्या गावातील संतोष गोरख सावंत आणि इतर ५ जणांनी येऊन त्यांना वाटेत अडवले. आणि पूर्वीच्या भांडणावरून शाहू कोकाटे यास कोयता, लोखंडी गज आणि काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले. आणि त्यांच्या भावाजवळ असलेल्या पिशवीतील २ लाख रुपये घेऊन पसार झाले. असे फिर्यादीत नमूद आहे.

**कडलास येथील घटना**

# कुलूप तोडून २ लाख ७५ हजार रुपयांचे दागिने पळवले

✔ **सांगोला** : जिन्याच्या बाजूस असलेल्या लोखंडी गेटचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील २ लाख ७५ हजार रुपयांचे दागिने पळवले. ही चोरी कडलास (ता. सांगोला) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी जनाबाई सोपान गायकवाड (वय ७० रा.गणेशवाडी कडलास ता. सांगोला) यांनी सांगोला पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या शुक्रवारी रात्री आपल्या पतीसोबत जेवण करून घरात झोपल्या होत्या. मध्यरात्रीनंतर चोरट्याने त्यांच्या घराच्या बाजूस असलेल्या जिन्याचे लोखंडी गेटचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील ६० ग्राम सोन्याचे दागिने चोरून नेले.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.



# ॲड. मिनल साठे यांची जनसंवाद यात्रा सुरू

## जनतेच्या समस्या जाणून घेत त्या सोडवण्याचे दिले आश्वासन : नागरिकांचे स्वीकारले निवेदन

✔ माढा/प्रतिनिधी

माढा विधानसभा मतदारसंघांमध्ये माढा शहराच्या नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांच्या नेतृत्वाखाली जनसंवाद यात्रेचा प्रारंभ पूर्व भागातून करण्यात आला.

या संवाद यात्रेच्या माध्यमातून मतदारसंघातील पायाभूत सोयी सुविधा, शेतकरी,शेतमजूर, महिला ,बेरोजगार ,यांच्या समस्या ऐकून त्या समस्या भविष्यात सोडवण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून करणार असे ॲड. साठे यांनी सांगितले. बुद्रुकवाडी (मारुती मंदिर) येथे आज जनसंवाद यात्रेनिमित्त माढा नगरपंचायत च्या नगराध्यक्षा ड. सौ.मीनल ताई साठे यांनी भेट दिली. यावेळी उपस्थित अमर रणपिसे , माऊली पवार, आबासाहेब वाघ, रोहन बुद्रुक उपस्थित होते. मानेगाव येथे लोकांनी समस्याचा पाढा वाचून दाखविला. यावेळी शुभम बेडगे ,बाबा देशमुख,सुरज पारडे, राजकुमार देशमुख, प्रशांत देशमुख, गजानन माने, शीतल जोकार,बाळासाहेब राऊत, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. धानोरे येथे सरपंच सौ छाया धावणे, अनिल देशमुख भारत देशमुख, किशोर देशमुख, कृष्णा नाटक, सचिन क्षीरसागर, मारुती बामणे, रजनीकांत देशमुख ग्रामस्थ उपस्थित होते यावेळी लोकांनी धानोरे ते तडवळे हा बऱ्याच वर्षी यापासून प्रलंबित असणाऱ्या रस्त्याचा प्रश्न उपस्थित केला. केवड येथे ॲड. समाधान लटके, संतोष लटके, दत्तात्रय लटके ,अतुल पिंजारी सत्यवान लटके, ज्योती लटके, मुकुंद धर्मे ,हनुमंत भोकरे, आणासहेब पाटील, महादेव गायकवाड, उपस्थित होते. उंदरगाव येथे शिवाजी चव्हाण शंकर नाईकवाडे, बालाजी मुजमुले, रवी चव्हाण, दत्ता कोळी, सोनम मोटे, किरण लवटे, गणेश पारडे, संतोष माने उपस्थित होते. संवाद यात्रेमध्ये वेदांत साठे, उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे, माढा नगरपंचायतीचे सर्व नगरसेवक उपस्थित होते.


माढाः जनसंवाद यात्रेत ग्रामस्थांची चर्चा करताना ॲड. मिनल साठे.

# भटक्या विमुक्त्यांच्या मागण्या संसदेत मांडणार

## शरद पवार यांनी समजाला दिला शब्द : भटक्या विमुक्त जाती समाजाचा मेळावा

✔ सोलापूर/प्रतिनिधी

लोकसभेच्या निवडणुकीत तुम्ही प्रणिती शिंदे आणि धैर्यशील मोहिते पाटिल यांना निवडून देत ४८ पैकी ३१जागा निवडून दिल्या. त्यामुळे तुमच्या मागण्या देशाच्या संसदेत मांडणे, हे आमचे नैतिक कर्तव्य आहे, भटक्या विमुक्त जातींच्या प्रश्नांना संसदेत वाचा फोडण्याचे काम केले जाईल, असा शब्द ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी भटक्या विमुक्तांच्या मेळाव्यात दिला.

माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत सोलापूरमध्ये रविवारी भटक्या विमुक्त जाती समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या मेळाव्यात बोलताना शरद पवार यांनी भटक्या विमुक्तांच्या प्रश्नावर भाष्य केले. शरद पवार म्हणाले, सेटलमेंट हे सोलापूर, बारामती आणि अंबरनाथला होते. यामध्ये भटक्या विमुक्त जातींना तारीच्या कुंपणात डांबून ठेवले जात होते. याबाबत सुटकेचा आदेश देशाचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी दिला होता. त्या भटक्या आणि विमुक्त जातींचा मेळावा आज आपण घेत आहोत. सुशीलकुमार शिंदे आणि मी मंत्री म्हणून काम करत असताना सत्तेच्या आणि अधिकाराच्या जागेवर भटक्या विमुक्तांना स्थान देण्यासाठी प्रयत्न केले. भटक्या विमुक्तांची जनगणना करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहेत. त्यांची संख्या कळल्यानंतर सरकारने त्यांच्यासाठी आर्थिक तरतूद कशा पद्धतीने केली पाहिजे, यासाठी मदत होईल. भटक्या विमुक्त जातीमधील वडार समाज हा अत्यंत महत्वाचा समाज आहे. घाम गाळून जगणाऱ्या वडार लोकांना रॉयल्टीपासून माफी द्यावी. भटक्या विमुक्तांसाठी आश्रम शाळाच्या संख्या वाढवल्या पाहिजेत, असेही पवार म्हणाले.



सोलापूर : भटक्या विमुक्त जाती समाजाचा मेळाव्यात बोलताना खा. शरद पवार. सोबत सुशीलकुमार शिंदे, सुधीर खरटमल, चेतन नरोटे आदी.

### समाजाच्या उन्नतीसाठी बजेट मांडले पाहिजे

भटक्या विमुक्त जाती या समाजाच्या उन्नतीसाठी बजेट मांडले पाहिजे. दलित वस्ती रमाई योजनेप्रमाणे भटके विमुक्तांसाठी घरकुल योजना राबविली पाहिजे. केंद्र सरकारने भटक्या विमुक्तांसाठी किती टक्के घरांची तरतूद केली आहे, असा सवालही शरद पवार यांनी विचारला.

### सत्ताधाऱ्यांपुढे मागण्यांबद्दलचा कार्यक्रम मांडावा

आगामी महिन्यात दिवसांत निवडणुकीचा काळ येईल, त्यावेळी सत्ताधाऱ्यांपुढे भटक्या विमुक्तांनी आपल्या मागण्यांबद्दलचा कार्यक्रम मांडावा लागेल. महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना या पक्षांच्या कार्यक्रमात या सर्व गोष्टींचा उल्लेख निश्चितपणे करण्यात येईल, असेही पवारांनी स्पष्ट केले.